# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## समाज विकास विभाग

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्ती विविध कल्याणकारी योजनांबाबत

## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीं कल्याणकारी योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये योजना राबविण्यात येत आहेत. ठाणे महानगरपालिका हद्दीत रहिवाशी असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता **योजना क्रमांक १ ते १३,२६ (उ) व २८ या योजनांचे अर्ज** दि.१२/१०/२०१८ ते दि.१२/११/२०१८ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन ठेवण्यात आलेले आहेत. परिपूर्ण भरलेले अर्ज दि.१२/१०/२०१८ ते दि.१४/११/२०१८ रोजी सायं.५.०० वाजेपर्यत **अर्ज प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. (योजना क्र.७ दिव्यांग व्यक्तीना वैद्यकीय खर्चाकरिता निधी उपलब्ध करुन देणे व योजना क्र.११ दिव्यांग व्यक्तीच्या लग्नासाठी अर्थ सहाय्य करणे.) योजना क्र.२८ दिव्यांगाना स्कुटर विथ ॲडप्शनसाठी अर्थसहाय्य देणे या योजनेची मुदत दि. १ मार्च २०१९ पर्यत राहिल.** योजना क्र. **२६ (उ)** व्यतिरिक्त एका लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ घेता येईल कृपया याची नोंद घ्यावी.

**समाज विकास विभागाकडून दिव्यांग व्यक्तींसाठी पुढील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.**

| अ. क्र | योजना क्र. | योजनेचे नांव |
|---|---|---|
| १. | १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती/ अर्थसहाय्य देणे. (प्रत्येकी रु.७५००/-) |
| २. | २ | दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. (प्रत्येकी रु.१०,०००/-) |
| ३. | ३ | दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी खेळाडूकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. (जिल्हास्तर /राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आतंरराष्ट्रीय स्तर) (प्रत्येकी रु.२०,०००/-) |
| ४. | ४ | उत्पन्नाच्या अटीवर घरकुलामध्ये दुरुस्ती/सुधारणा करण्यासाठी अर्थ सहाय्य देणे. (प्रत्येकी रु.२५,०००/-) |
| ५. | ५ | दिव्यांग व्यक्तीना उदरनिर्वाह करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बॅंक खात्यात(NEFT /RTGS /ECS) जमा करणे. (प्रत्येकी रु.२४,०००/-) |
| ६. | (अ) | दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बॅंक खात्यात (NEFT /RTGS /ECS) जमा करणे. (कमाल मर्यादा रु. २५,०००/-) |
| | (ब) | दिव्यांग व्यक्तींना साहित्य खरेदी करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्यांच्या बॅंक खात्यात (NEFT /RTGS /ECS) जमा करणे. (कमाल मर्यादा रु. २५,०००/-) |
| ७. | ७ | दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय खर्चाकरिता अर्थ सहाय्य देणे.<br>(एकूण औषधोपचाराच्या ५० % रक्कम किंवा ५०,०००/- यापैकी जे कमी असेल ते) |
| ८. | ८ | दिव्यांग व्यक्तीच्या बचत गटांना अर्थ सहाय्य देणे. (प्रत्येकी रु.१५,०००/- ) |
| ९. | ९ | ६० वर्षावरील दिव्यांगाना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य देणे. (प्रत्येकी रु.२४,०००/-) |
| १०. | १० | दिव्यांग बेरोजगारांना भत्ता / अर्थसहाय्य देणे. (प्रत्येकी रु.२४,०००/-) |
| ११. | ११ | दिव्यांग व्यक्तीच्या लग्नासाठी अर्थ सहाय्य करणे. (प्रत्येकी रु.५०,०००/-) |
| १२. | १२ | कुष्ठ रुग्णांना उदरनिर्वाहासाठी अनुदान देणे . (प्रत्येकी रु.२४,०००/-) |
| १३. | १३ | ६० वर्षावरील दिव्यांग व्यक्तीना ऑटोमॅटिक व्हीलचेअर उपलब्ध करुन देणे. |
| १४. | २६ (उ) | दिव्यांग विद्यार्थी/व्यक्तीकरिता प्रशिक्षण देणे. |
| १५. | २८ | दिव्यांगाना स्कुटर विथ ॲडप्शनसाठी अर्थसहाय्य देणे. (कमाल मर्यादा रु.५०,०००/-) |

**टिप** :- ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजनेचे अर्ज वरील कालावधीमध्ये उपलब्ध होतील. सदरचे अर्ज पुर्ण विहित कालावधीत भरुन संबंधित प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. विविध योजनांचे छापील अर्जावर अनुक्रमांक देण्यात आला असल्याने सदर अर्जाचाच स्विकार केला जाईल. झेरॉक्स अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीने.**

(सही /-)
उपआयुक्त
समाज विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.